जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ३०५ दिनांक - ०४/०५/२०२१**

युनिट ६ गुन्हे शाखा पुणे शहर

**जबरी चोरी, घरफोडी व वाहनचोरी करणारा सराईत गुन्हेगार गुन्हे शाखा, युनिट - ६ कडुन जेरबंद**

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर श्री अमिताभ गुप्ता यांनी पोलीस आयुक्त पुणे शहर म्हणून पदभार स्विकारल्यानंतर शहरातील अवैदय धंदे, बेकायदेशीर कृत्य करणारे गुन्हेगार तसेच शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे गुन्हेगार यांचेंवर कठोर कारवाई करुन गुन्हयांचे व गुन्हेगारांचे समूळ उच्चाटन करण्या संदर्भातील धोरण स्विकारले आहे व त्यासंदर्भात आदेश सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना दिले आहेत.

. वरिष्ठांचे आदेशानुसार गुन्हे शाखा, युनिट ६ चे पथक दि. २९/०४/२०२१ रोजी गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना पो.ना.नितीन मुंढे यांना मिळालेल्या बातमीवरुन रेकॉर्डवरील शिकलकरी गुन्हेगार अमरसिंग जगरसिंग टाक, रा. गोसावीवस्ती, बिराजदारनगर, हडपसर, पुणे यास ताब्यात घेवुन तपास करता त्याने लोणी काळभोर पो.स्टे. गु.र.न.२४६/२०२१ भादवि कलम ३९२,३४ या गुन्हयातील सॅन्ट्रो कार MH12/PH 9138 ही त्याचा साथीदार नामे जयपालसिंग ऊर्फ मोन्यासिंग राजपालसिंग टाक याचेसह कदमवाक वस्ती, लोणी काळभोर पुणे येथून फिर्यादीचे ताब्यातुन जबरीने चोरुन घेवून गेलो होतो अशी कबुली दिल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. नमुद आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेविरुध्द पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहरातील विविध पोलीस स्टेशनमध्ये घरफोडी व वाहनचोरी असे एकुण ६ गुन्हे दाखल आहेत. अटक आरोपीने पोलीस कस्टडी रिमांड दरम्यान त्याचे साथीदारासह खालील गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

१.लोणी काळभोर पो.स्टे. गु.र.नं. २४६/२०२१ भादवि कलम ३९२,३४ या गुन्हयातील ३,५०,०००/- रु. किंमतीची सॅन्ट्रो कार

२.हडपसर पो.स्टे. गु.र.नं. २८९/२०२१ भादवि कलम ४५४,४५७,३८०,३४ या गुन्हयातील १,४४,०००/- रु. किमतीचे अंदाजे ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने

३.लष्कर पो.स्टे. गु.र.नं. ५९/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील ५०,०००/- रु. किंमतीची हिरो स्प्लेंडर प्लस मो.सायकल

४.वानवडी पो.स्टे. गु.र.नं. १३९/२०२१ भादवि कलम ३९२,३४ या गुन्हयातील १,००,०००/- रु. किंमतीची व्हेस्पा मोपेड

असा एकुण ६,४४,०००/- रु. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीने खालील पोलीस स्टेशनकडील गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

५.खडकी पो.स्टे. गु.र.नं. ६६/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील इको कार
६.खडकी पो.स्टे. गु.र.नं. ९९/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील झेन कार
७.कोरेगाव पार्क पो.स्टे. गु.र.नं. ३७/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील हिरो पॅशन प्रो
८.पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.न. ५१८/२०२० भादवि कलम ४५४,४५७,३८० या गुन्हयातील पाहिजे आरोपी.
९.पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.न. ३३/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील पाहिजे आरोपी.

**अशाप्रकारे आरोपी नामे अमरसिंग जगरसिंग टाक यास अटक करुन एकुण ९ गुन्हे उघडकीस येवून ६,४४,०००/- रु. मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.**

हे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. आरोपी अमरसिंग जगरसिंग टाक यास आजरोजी मा.न्यायालयाने मॅजि.कस्टडी रिमांड दिली आहे. नमुद गुन्हयाचा तपास मा. गणेश माने, पोलीस निरीक्षक, युनिट ६, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा. मच्छिंद्र वाळके हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.अशोक मोराळे, मा.पोलीस उपआयुक्त, श्री. श्रीनिवास घाडगे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे २, श्री. लक्ष्मण बोराटे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ६ चे पोलीस निरीक्षक, श्री. गणेश माने, अंमलदार नितीन मुंढे, मच्छिंद्र वाळके, राहुल माने, ऋषिकेश टिळेकर, प्रतिक लाहिगुडे, शेखर काटे, नितीन धाडगे व संजय देशमुख यांनी केली आहे.